## स्पे. मु. नं. ६/२०१५ मधील निशाण २७ खालील आदेश

१) प्रतिवादी नं. २ व ३ तर्फे सदरचा अर्ज हा झालेला मनाई आदेश रद्द करण्याकरिता दाखल केलेला आहे. वादीने निशाणी ३३ द्वारे सदर अर्जावर म्हणणे दाखल करून प्रस्तुत अर्जास विरोध दर्शविलेला आहे.

२) वादी, प्रतिवादी यांच्या विद्वान विधिज्ञांचा युक्तिवाद ऐकला. उपलब्ध कागदपत्रांचे अवलोकन केले. खालील वाद प्रश्नांचे उत्तर कारणांसह देत आहे ते खालीलप्रमाणे.

| | वाद प्रश्न | उत्तर |
|---|---|---|
| १. | प्रतिवादी नं. २ व ३ यांनी मनाई आदेश रद्द करण्याकरिता योग्य व संयुक्तिक कारण दिले आहे का ? | ... **नाही.** |
| २. | काय आदेश ? | ... **अंतिम आदेशानुसार** |

## का र ण मि मां सा

**वाद प्रश्न क्र. १ चे उत्तर**

३) प्रतिवादी नं. २ व ३ चे अर्जात कथन की, वादीने प्रतिवादींविरूध्द कराराप्रमाणे खरेदीखत होवुन मिळण्यासाठी अर्ज दाखल केलेला आहे. सदर दाव्यामध्ये वादीने या प्रतिवादींविरूध्द दावा मिळकत विक्री अथवा हस्तांतर करू नये, तसेच कर्ज बोजा वगैरे निर्माण करू नये इत्यादीसाठी अर्ज दिला होता. सदर प्रतिवादी नं. २ व ३ यांनी दावा दाखल करण्यापूर्वीच प्रतिवादी नं. १ कडुन दावा मिळकत खरेदी केलेली होती. यामध्ये वादीचा मनाई अर्ज मंजुर करून प्रतिवादी नं. २ व ३ यांनी दावा मिळकतीमध्ये कोणत्याही प्रकारचे हक्क निर्माण करू नये म्हणजेच सदर दावा मिळकत वादीच्या म्हणण्याप्रमाणे कोणासही विक्री, गहाण, दान इ. प्रकारे बोजा निर्माण करू नये अशी वादीची मागणी मंजुर केलेली आहे. याचा वादीने गैरअर्थ काढुन प्रतिवादी नं. २ व ३ यांच्या नांवाच्या नोंदीची

मंडल अधिकारी, लवंग यांच्यासमोर तक्रारी केल्या व न्यायालयाने मनाई दिल्याबाबत कथने केली व नोंदी होवु दिली नाही, रद्द करण्यास भाग पाडले. सदर नोंदीचा निकाल वादीने संगनमत करून बेकायदेशिररित्या केलेला आहे. वादीने खोडसाळपणे न्यायालयाच्या आदेशाचा दुरूपयोग करून न्यायालयाच्या आदेशाचा अवमान केलेला आहे. तरी झालेला आदेश रद्द करण्यात यावा अशी मागणी केलेली आहे.

४) वादीने सदर अर्जावर म्हणणे दाखल करून प्रस्तुत अर्जास विरोध केलेला आहे. या वादीचे कथन की, वादीचा निशाणी ५ वरील आदेश हा या प्रतिवादी नं. २ व ३ विरूध्द मंजुर झालेला आहे. सदर हुकूमाची सही शिक्क्याची नक्कल मंडल अधिकारी यांच्याकडे दाखल केलेली होती. त्यामध्ये सदर नोंदी ह्या नामंजुर करण्यात आलेल्या आहेत. मंडल अधिकारी यांनी हुकूमाचा काय अर्थ काढायचा हा त्यांचा विषय आहे. वादीने न्यायालयाच्या आदेशाचा दुरूपयोग केलेला नाही. प्रतिवादी नं. २ व ३ यांनी नि. ५ च्या विरोधात दिवाणी किरकोळ अपील नं. ४१/२०१५ दाखल केलेला आहे. त्यामुळे प्रतिवादींनी दिलेला सदरचा अर्ज हा बेकायदेशिर आहे. त्यामुळे तो नामंजुर करावा अशी मागणी केलेली आहे.

५) याठिकाणी वादी व प्रतिवादी यांच्या कथनांचा विचार करता, निशाणी ५ वरील आदेश हा प्रतिवादी नं. २ व ३ विरूध्द झालेला आहे. त्याच्याविरूध्द प्रतिवादींनी अपील दाखल केलेले आहे. याठिकाणी मंडल अधिकारी यांनी प्रतिवादी नं. २ व ३ यांच्या नोंदीसंबंधी अर्ज नामंजुर केलेला आहे. प्रतिवादीच्या कथनानुसार मंडल अधिकारी यांनी न्यायालयाचा झालेल्या आदेशाचा चुकीचा अर्थ घेवुन प्रतिवादीची नोंद नामंजुर केलेली आहे. या गोष्टीचा विचार करता या न्यायालयाचा आदेश आणि त्याचा अर्थ काढुन वादीने संगनमत करून प्रतिवादींची

नोंद रद्द केली अशाप्रकारचा आशय प्रतिवादीच्या अर्जावरून दिसुन येतो. याठिकाणी या आशयाचा विचार करता आदेशाचा अर्थ चुकीचा काढुन नोंद रद्द केली त्यामुळे झालेला आदेश रद्द करावा अशी मागणी केलेली आहे. या मागणीचा विचार करता प्रतिवादीने झालेल्या आदेशाविरूध्द अपील केलेले आहे. तसेच मंडल अधिकारी यांनी केलेल्या आदेशाविरूध्द प्रतिवादीनी मागणी केलेली आहे. अशा परिस्थितीमध्ये प्रतिवादींनी अर्जास दिलेले कारण योग्य व संयुक्तिक नाही. झालेल्या आदेशाविरूध्द प्रतिवादींनी त्या त्या न्यायालयाच्या वरिष्ठाकडे दाद मागितलेली आहे. त्यामुळे सदर अर्ज हा चालण्यास पात्र नाही. त्यामुळे या व वरील कारणास्तव मी वाद प्रश्न क्रमांक १ चे उत्तर 'नाही' असे देत आहे.

**वाद प्रश्न क. २ चे उत्तर**

६) या वाद प्रश्नाच्या उत्तरादाखल खालीलप्रमाणे आदेश करीत आहे.

**आ दे श**

प्रतिवादी नं. २ व ३ यांचा निशाणी २७ वरील अर्ज खर्चासह नामंजुर करण्यात येत आहे.

( **एस. एस. इंदलकर** )
दिवाणी न्यायाधीश व. स्तर,
माळशिरस.

दिनांक : २३.०६.२०१६.

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this PDF file Order is same word to word as per the original Order.

(a) Name of the Stenographer : **S. M. Malkapalli**

(b) Court : **Civil Court Senior Division, Malshiras.**

(c) Order signed by P.O. on : **23.06.2016.**

(d) Order uploaded on : **23.06.2016.**